दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगड नगरी
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
• वर्ष १६ वे • अंक ७५ • MAHMAR/2006/17212 • रायगड • मंगळवार दि.८ जून २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

राज्यात आज १०,२१९ नवीन रुग्णांचे निदान

दै.रायगड नगरी । मुंबई

राज्यात आज १० हजार २१९ नवीन कोरोनाबाधित रुग्णांची नोंद झाली आहे. तर आज २१ हजार ०८१ कोरोना बाधित रुग्णांना डिस्चार्ज देण्यात आला आहे. त्यामुळे कोरोनातून बरे होणाऱ्या रुग्णांची संख्या आता ५५,६४,३४८ इतकी झाली आहे तर रिकव्हरी रेट ९५.२५ टक्के झाला आहे. आज १५४ कोरोनाबाधित रुग्णांच्या मृत्यूची नोंद झाली आहे. राज्यात आज एकूण १,७४,३२० सक्रीय रुग्ण आहेत. सध्या राज्यात १२,४७,०३३ व्यक्ती होम क्वारंटाईनमध्ये आहेत तर ६,३२३ व्यक्ती संस्थात्मक क्वारंटाईनमध्ये आहेत.

राज्यातील परिस्थिती हळूहळू नियंत्रणात येत आहे. राज्यातील एकूण ३० जिल्हे आणि महानगरपालिका क्षेत्रात आज एकाही मृत्यूची नोंद झालेली नाही. मुंबई महापालिका क्षेत्रात सर्वाधिक २८, कोल्हापूरमध्ये २७, कोल्हापूर महापालिका क्षेत्रात १४, अहमदनगरमध्ये ११ तर सोलापूरमध्ये १० मृत्यूंची नोंद झाली आहे.

लोकनेते दि. बा. पाटील यांचेच नाव हवे; मुंबईतही गजर

नवी मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळ ; १० जूनला भव्य मानवी साखळीची जोरदार तयारी

दै.रायगड नगरी । मुंबई

नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळाला दिवंगत लोकनेते दि. बा. पाटील यांचेच नाव द्यावे, अशी मागणी मुंबई, नवी मुंबई, ठाणे, रायगड, पालघर आदी जिल्ह्यांतील लोकप्रतिनिधी प्रकल्पग्रस्त शेतकरी, कष्टकरी, ओबीसी जनता सुरुवातीपासून करीत आहे. या मागणीकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी येत्या १० जून रोजी वरील जिल्हयात मानवी साखळी आंदोलन करण्यात येणार आहे, अशी माहिती लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीचे अध्यक्ष दशरथदादा पाटील यांनी आज(दि. ०७ जून) मुंबई येथे झालेल्या पत्रकार परिषदेत दिली.

मुंबई मराठी पत्रकार संघाच्या सभागृहात झालेल्या या पत्रकार परिषदेस नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीचे उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव संतोष केणे, सर्वपक्षीय कृती समितीचे सहचिटणीस दीपक म्हात्रे, खजिनदार जे. डी. तांडेल, गुलाबराव वझे, पनवेल महानगर पालिकेचे उपमहापौर व आरपीआय कोण प्रांत अध्यक्ष जगदीश गायकवाड, भाजपचे युवा नेते दशरथ म्हात्रे, कृती समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी माहिती देताना दशरथदादा पाटील यांनी सांगितले की, लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव विमानतळाला देण्यासाठी यापूर्वी राज्य आणि केंद्र सरकारकडे विनंती करण्यात आली आहे. तरी देखील अचानकपणे १७ एप्रिल रोजी सिडकोच्या संचालक मंडळाने लोकभावनेचा विचार न करता शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे नाव देण्याचा प्रस्ताव मंजूर केला. त्यामुळे रायगड, नवी मुंबई, ठाणे, पालघर, कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ, मुंबई या विभागातील प्रकल्पग्रस्त शेतकरी, कष्टकरी सर्व समाजातील जनतेमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. हे सारे प्रकल्पग्रस्त तसेच सामाजिक व राजकीय संघटनांनी येत्या १० जून रोजी भव्य मानवी साखळी आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. या आंदोलनात २५ ते ३० हजार लोकांचा सहभाग असणार असल्याचे सांगून तशी तयारी झाली असल्याचेही त्यांनी नमूद केले. तसेच सरकारने याबाबत निर्णय न घेतल्यास हे आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही त्यांनी यावेळी दिला. त्या अनुषंगाने २४ जूनला लोकनेते दि. बा. पाटील यांच्या स्मृतिदिनी सिडकोला भव्य आंदोलनातून घेराव घालण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी पत्रकारांना माहिती देताना माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले की, २ जानेवारी २०१५ रोजी खासदार कपिल पाटील यांनी लोकभावनेचा विचार करून लोकसभेत ही मागणी केली. त्या संबंधीचे पत्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दिले आहे. तसेच महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे तत्कालीन अध्यक्ष व सध्याच्या मंत्रिमंडळातील सार्वजनिक बांधकाम खात्याचे मंत्री ना. अशोक चव्हाण यांच्याकडे दि. बा. पाटील यांच्या नावाचा प्रस्ताव दिला असता त्यांनी तो तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे १९ जून २०१८ रोजी पाठविला. देवेंद्र फडणवीस यांनीसुद्धा तो प्रस्ताव उचित कार्यवाही करण्याच्या सूचनेसह प्रधान सचिव (विमानचालन) यांच्याकडे पाठविला होता. तसे ७ जुलै २०१८ रोजी अशोक चव्हाण यांना मुख्यमंत्र्यांनी लेखी कळविलेही होते. तसेच स्थानिक दहा गाव विमानतळ प्रकल्पबाधित संघटनेच्या वतीने व विविध सामाजिक संघटनांच्या वतीने सिडकोकडेही मागणीही केली होती. पण ही लोकभावना लक्षात न घेता सिडकोने आता जी कृती केली आहे. त्यामुळे प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांमध्ये सिडकोविरुद्ध तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे, असेही रामशेठ ठाकूर यांनी सांगितले. दि. बा. पाटील साहेबांमुळे प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळाला, त्यांनी संघर्ष केला नसता तर येथील प्रकल्पगस्त, शेतकरी, स्थानिक, नागरिकांच्या पदरी काहीही पडले नसते. त्यांच्यामुळे परिसराचा विकास झाला ते सर्वांचे आधारस्तंभ राहिले आहेत. साडेबारा आणि साडे बावीस टक्केचा निर्णय त्यांच्या संघर्षातून निर्माण झाला आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने प्रकल्पग्रस्त गावांमध्ये वैभव पहायला मिळते. त्यामुळे नवी मुंबई विमानतळाला प्रकल्पगस्तांचे नेते दि. बा. पाटील यांचेच नाव द्यावे हि ९५ टक्के लोकांची मागणी आहे. आणि त्याप्रमाणे विविध ग्रामपंचायतींनी, गावांनी ठराव सुद्धा केला आहे, असेही त्यांनी आवर्जून नमूद केले. दि. बा. पाटील असताना प्रकल्पग्रस्तानच्या ५० टक्के मागण्या पूर्ण झाल्या आहेत, आजही ५० टक्के मागण्या प्रलंबित आहे. नामकरणाबरोबरच प्रलंबित मागण्या पूर्ण करण्यासाठीची कृती समितीची भूमिका असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केली. सिंधुदुर्ग येथील चिपी विमानतळाला स्व. बाळासाहेब ठाकरे यांचे नाव द्या असे माजी मुख्यमंत्री नारायण राणे यांनी सूचित केले होते त्यावेळी त्या विभागातील खासदार विनायक राऊत यांनी विमानतळ व्हायला एक दोन वर्ष वेळ आहे असे सांगितले मग नवी मुंबई विमानतळ पूर्ण व्हायला चार वर्षे लागतील असे असतानाही तिकडे वेगळे इकडे वेगळे हि काय भूमिका आहे. जनता सुज्ञ आहे, त्यामुळे लोकनेते दि. बा. पाटील यांचेच नाव नवी मुंबई विमानतळाला देण्यात यावे.

आपल्या बुलंद आवाजाने महाराष्ट्र विधीमंडळात तसेच खासदार म्हणून दिल्लीच्या सार्वभौम संसदेत शेतकऱ्यांचे, कष्टकऱ्यांचे प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न त्यांनी पोटतिडकीने मांडले. मंडल आयोगाच्या अंमलबजावणीसाठी आणि त्यानंतर ओबीसी समाजात जागृती करण्यासाठी त्यांनी सारा महाराष्ट्र पिंजून काढला. संयुक्त महाराष्ट्र चळवळ, सीमा प्रश्न अशा अनेक जनलढ्यात त्यांनी हिरीरीने भाग घेऊन तुरुंगवास भोगला आहे. त्यामुळे त्यांचे हे कार्य नव्या पिढीला स्फूर्तिदायी ठरावे यासाठी त्यांच्या कर्मभूमीत त्यांची स्मृती जागरूक राहावी यासाठी नवी मुंबईत होत असलेल्या विमानतळाला त्यांचेच नाव द्यावे, अशी मागणी विविध पक्षांच्या नेत्यांनी सामाजिक संघटनांनी तसेच प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी केली आहे. राज्य सरकारने याचा गांभीर्याने विचार करून दि. बा. पाटील यांचेच नाव नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळाला द्यावे, अशी मागणी या पत्रकार परिषदेत करण्यात आली.

संक्षिप्त...

सॅनिटायझर तयार करणाऱ्या कंपनीला भीषण आग,२० जणांचा होरपळून मृत्यू

पुणे : वृत्तसंस्था

पौड रस्त्यावरील घोटवडे फाट्याजवळील उरवडे रोड येथे एका सॅनिटायझर बनविणाऱ्या कंपनीला भीषण आग लागून २० जणांचा होरपळून मृत्यू झाला आहे. यामध्ये प्रामुख्याने महिला कामगारांचा समावेश आहे. आणखी काही कामगार अडकले असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची भीती आहे सोमवारी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास ही आग लागली. आग नेमकी कशामुळे लागली, ते समजू शकले नाही मात्र, आगीची तीव्रता पाहता आतमध्ये मोठ्या प्रमाणात सॅनिटायजर तसेच इतर ज्वलनशील रसायन साठा असण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. सॅनीटायझर बनविले जात असल्याने आगीने थोड्याच वेळात रौद्र रुप धारण केले होते. स्थानिक ग्रामस्थांनीही तातडीने धाव घेतली. घटनास्थळी आक्रोश आणि किंकाळ्या ऐकू येत होत्या. जेसीबीच्या सहाय्याने भिंत फोडून कामगारांना सुखरूप बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरू केले. प्राथमिक माहितीनुसार ३७ पैकी १० कामगारांना बाहेर काढण्यात यश मिळाले. मात्र, २० कामगार अडकले होते. सायंकाळी उशिरापर्यंत २० जणांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले.

ए.टी.एम.साठी जागा भाड्याने देणे आहे

पवन अपार्टमेंट येथील लोखंडीपाडा, नवीन जिल्हा सत्र न्यायालयासमोरील जागा बँकेच्या ए.टी.एम.साठी जागा भाड्याने देणे आहे.

संपर्क : ९२२३३४५२४९

गुन्हेगारी कदापी सहन केली जाणार नाही : भागवत सोनावणे

दै.रायगड नगरी । अरविंद पोतदार

पनवेल : पनवेलचे सेवानिवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त नितीन भोसले-पाटील यांचा कार्यकालावधी संपल्यानंतर नवी मुंबई आयुक्तालय परिमंडळ २ पनवेलच्या सहाय्यक पोलीस आयुक्तपदी भागवत सोनावणे यांची नियुक्ती करण्यात आली.

पोलीस सेवेमध्ये उत्कृष्ट व चोख कामगिरी बजाविल्याने त्यांना ३५५ च्या वर रिवॉर्ड मिळालेले आहेत तसेच त्यांना पोलीस महासंचालक सन्मान चिन्हाने देखील गौरविलेले आहे. एक कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून त्यांची ओळख असून, नुकताच त्यांनी आपला पदभार स्वीकारला आहे. मुळचे जळगाव येथील असलेले भागवत सोनावणे यांना पहिल्या पासूनच पोलीस खात्याची आवड होती. एक प्रकारे आव्हानात्मक काम असून नागरिकांच्या संरक्षणाची जबाबदारी पोलिसांकडे असते. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आपला नेहमी प्रयत्न राहील. अन्यायग्रस्त लोकांसाठी आपले दालन सदैव सुरू असून काही गुन्हेगारी प्रवृत्तीची माणसे गोरगरीबांवर अन्याय करण्याचा प्रयत्न करतात तो कदापी सहन केला जाणार नाही

असे त्यांनी दैनिक रायगड नगरीशी बोलताना सांगितले.

मुंबई (लाचलुचपत उपअधिक्षक), नागपुर, नाशिक शहर, नाशिक ग्रामीण, नांदेड, जालना, बुलढाणा, अमरावती अशा विविध ठिकाणी त्यांनी आपलया कार्याचा ठसा उमटविला आहे. तसेच आपल्या कार्यक्षेत्रात कडक कार्यप्रणालीच्या जोरावर तेथील गुन्हेगारी ठेचुन काढली आहे तर सर्व सामान्य जनतेबरोबर त्यांनी सलोख्याचे नाते ठेवुन कायदा व सुव्यवस्थेचे अगदी काटेकोरपणे पालन करण्याचे सुत्र चोखपणे बजावल्याने त्यांना १ मे २०१७ रोजी पोलीस महासंचालक सतीश माथुर यांच्या हस्ते पोलीस दलातील प्रशंसनिय सेवेसाठी 'पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह' प्रदान करण्यात आले. याशिवाय साधारण ३५५ रिवॉर्डही भागवत सोनावणे यांना मिळाले आहेत.

पनवेलमधील नागरिकांनी देखील नियमांचे योग्य पद्धतीने पालन करावे. आम्ही आपल्या सोबत आहोतच. आपले संरक्षण करण्याची जबाबदारी आमची आहे. तसेच आपल्या परिसरात कुठलाही अनुचित प्रकार, गुन्हेगारी, भाईगीरी अशा स्वरूपाचे दबाबतंत्र कुणीही वापरण्याचे काम करीत असल्यास त्वरित पोलिसांशी संपर्क करावा असे आवाहन त्यांनी दै.रायगड नगरीशी बोलताना केले.

रायगड जिल्ह्यात चार दिवस अतिवृष्टीचा इशारा

आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेला २४ तास सतर्क राहण्याचे आयुक्तांचे आदेश

दै.रायगड नगरी । पनवेल

हवामान खात्याच्या अंदाजानूसार दिनांक ९ जून ते १२ जून पर्यंत अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर आयुक्त सुधाकर देशमुख यांच्या आदेशानुसार पनवेल महानगरपालिकेत आपत्कालीन व्यवस्थापन कक्ष स्थापन करण्यात आला आहे. आपत्कालीन परिस्थितीतील उपाययोजनांसाठी महापालिकेतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची विविधपदी नियुक्ती करण्यात आली आहे. आपत्कालीन परिस्थितीत उपाययोजनांसाठी कोविड रुग्णालयांचे व्यवस्थापन, विद्युत वितरण कंपनी, अग्निशमन विभाग, आपत्ती व्यवस्थापनाशी संबधित महसूल विभाग, पोलिस प्रशासन तसेच इतर संलग्न विभागाशी संपर्कात राहून काम करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

दिनांक ९ ते १२ जूनच्या दरम्यान अतिवृष्टी होण्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला असल्याकारणाने आपत्कालीन व्यवस्थापन कक्षास २४/७ सतर्क राहण्याचे आदेश देण्यात आले आहे. अतिवृष्टीच्या काळात गरजेनूसार बोटी, शोध व बचावाचे साहित्य, बॅटरी, दोरखंड, क्रेन, जेसीबी असे सर्व साहित्याचे नियोजन करण्याचे आदेश अग्निशमन विभागास दिले आहेत. तसेच अतिवृष्टी काळात कोव्हिड रुग्णालयातील जनरेटरची सुविधा, .../२

> ९ जून ते १२ जून या कालावधीमध्ये अतिवृष्टीच्या काळात झाडांखाली उभे राहू नये, वीजेच्या खांबाखाली उभे राहू नये. शक्य झाल्यास अतिवृष्टीच्या काळात घराबाहेर पडू नये.
>
> **- धैर्यशील जाधव (सहाय्यक आयुक्त, पनवेल महानगरपालिका)**

पनवेलच्या आयुर्वेदाचार्य डॉ.ज्योती जोशी यांची प्रितम म्हात्रे यांनी घेतली भेट

दै.रायगड नगरी । पनवेल

कोरोनाच्या वैश्विक संकटामध्ये पनवेलमधील आयुर्वेदाचार्य डॉ.ज्योती जोशी यांनी केलेल्या रिसर्चवर आयुष मंत्रालयामार्फत आयुर्वेदिक उपचार पद्धतीचा जास्तीत जास्त अवलंब करण्यासाठी सकारात्मक विचार करण्यात आला आहे. त्यांनी केलेल्या कामाची थेट पंतप्रधान कार्यालयाला सुद्धा दखल घ्यावी लागली या अशा आपल्या पनवेलच्या आयुर्वेदाचार्य डॉ. ज्योती जोशी यांची विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी भेट घेऊन त्यांना त्यांच्या पुढील कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी नगरसेविका डॉ.सुरेखा मोहकर, नगरसेविका सौ.सारीका भगत तसेच जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे भुसंपादनाच्या मोजणीला शेतकऱ्यांचा विरोध

दै.रायगड नगरी । पेण

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळा मार्फत पेण तालुक्यातील डोलवी औद्योगिक विकास क्षेत्रासाठी काराव – गडब, डोलवी, वडखळ, बोरी ग्रामपंचायत परिसरातील जमिन संपादित करण्यात येणार आहे. या भुसंपादनाला येथील शेतकऱ्यांनी विरोध दर्शविला असुन या भुसंपादनाचे मोजणीसाठी गडब येथील जांभेळा, चिर्बी येथील जमिन मोजणीसाठी आलेल्या अधिकाऱ्यांना शेतकऱ्यांनी विरोध केला.

औद्योगिक विकास महामंडळामार्फत डोलवी औद्योगिक विकास क्षेत्रासाठी पेण तालुक्यातील वावे, कोळवे, बेणेघाट, डोलवी, खारढोंबी, खारचिर्बी, खारकारावी, काराव, खारमांचेळा, खारजांभेळा, खारघाट या गावातील २१२० एकर जमिन संपादित करण्यात येणार आहे. या भुसंपादना बाबत

येथील शेतकऱ्यांना औद्यौगिक विकास १९६१ चा कलम ३२ (२) अन्वये व्यक्तिगत नोटीस शासनाने बजावल्या सदर भुसंपादन करताना शासनाने शेतकऱ्यांसोबत कोणत्याही प्रकारची चर्चा न करता नोटीसी बजावल्यामुळे सदर भुसंपादनाला शेतकऱ्यांनी विरोध दर्शविला आहे. या भुसंपादनामुळे शेतकऱ्यांचे उपजिविकेचे साधन नष्ट होणार आहे. गावाचा विस्तार करण्यासाठी जागाच शिल्लक राहाणार नाही. तर अनेकांची घरे देखील या भुसंपादनात बाधित होणार आहेत. अनेकांचे छोटे मोठे व्यवसाय या जागेत आसल्याने अनेकांचा रोजगार जाणार आहे. त्यामुळे या भुसंपादनाला शेतकऱ्यांचा विरोध आहे. हे भुसंपादन रद्द करावे अशा हरकती उपविभागिय अधिकारी कार्यालय ..../२

परतीची आश्वासक वाट

'करोना'ची दुसरी लाट आटोक्यात येत असल्याची लक्षणे दिसत असल्याने महाराष्ट्र सरकारने नवी नियमावली जाहीर केली आहे. सरकारच्या या निर्णयाचे स्वागत करतानाच ही नवी नियमावली यशस्वी करण्याची जबाबदारी सर्वस्वी समाजावर म्हणजेच प्रत्येक नागरिकावर आहे, हे आवर्जून सांगणे आवश्यक आहे. गेल्या वेळी पहिली लाट ओसरल्यानंतर निर्बंध सैल झाले होते. त्यानंतर सर्वांनी जबाबदारीने वर्तन केले असते तर दुसऱ्या लाटेचा तडाखा इतका बसला नसता. तसेच, देशातील सर्वाधिक बळी जाणारे आणि सर्वाधिक रुग्णसंख्या असणारे राज्य म्हणून महाराष्ट्राची जी अपकीर्ती झाली, तीही कदाचित टळली नसती. झाले ते झाले. आता भविष्यात तिसरी लाट येण्याचीही शक्यता आहे. ती अगदी काही आठवडे किंवा महिन्यांच्या अंतरावरही दबा धरून बसली असू शकते. तिचा रोख लसीकरण न झालेल्या लहान मुलांवर असेल का, अशीही भयशंका आहे. अशावेळी, दुसऱ्या लाटेला निरोप देताना प्रशासनाने केलेली नियमावली कठोरपणे अमलात आणणे, वेळेच्या साऱ्या मर्यादा पाळणे आणि अस्थानी शौर्य न दाखविणे, आपल्याच हिताचे ठरणार आहे. करोना रुग्णांच्या संख्येनुसार राज्य सरकारने राज्याची विभागणी पाच गटांमध्ये केली आहे. हे अतिशय योग्य पाऊल आहे. हे विकेंद्रीकरण मागेच करायला हवे होते. पाचव्या म्हणजे सर्वाधिक रुग्णप्रमाण असणाऱ्या गटात केवळ कोल्हापूर हा एकच जिल्हा आज आहे. याचा अर्थ, एकंदरीत परिस्थिती आटोक्यात येते आहे. या आधीच्या चौथ्या गटातही रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि सांगली हे चारच जिल्हे आहेत. सुदैवाने, लोकसंख्येची घनता आणि प्रमाण अधिक असणारे मोठे जिल्हे अधिक सावरलेले आहेत. ते निर्बंधमुक्त काळातही तसेच राहती, अशी अपेक्षा आहे. राज्य सरकारने जिल्ह्यांबाबत जशी वर्गवारी केली आहे, तशीच वर्गवारी जिल्हाधिकाऱ्यांनी पुढे तालुका आणि गाव पातळीवरही करायला हवी. तसे केले तर तळागाळापर्यंत जबाबदारीची जाणीव पाझरेल तसेच करोना नियंत्रणात ठेवण्याचे नेमके प्रयत्न करणे सोपे जाईल. दुसऱ्या लाटेत, महाराष्ट्राचा ग्रामीण भाग अधिक तडाख्याखाली आला. त्यामुळेच, गाव पातळीवरचे प्रयत्न महत्त्वाचे आहेत. काही तरुण सरपंचांनी पुढाकार घेऊन अवघ्या काही आठवड्यांत गावातले सारे वातावरण बदलवून टाकले. या यशोगाथा 'महाराष्ट्र टाइम्स'ने प्रकाशित केल्या आहेत. आता निर्बंध सैल होत असले तरी हीच काटेकोर काळजी, निगराणी, चाचणी आणि रुग्णांवरील उपचार हे ढिले पडता कामा नये. नाहीतर, पुन्हा त्याची जबर किंमत मोजावी लागेल. अनेक शहरांमध्ये आता बस वाहतूक सुरू होते आहे. तसेच, एसटी प्रवासही सुरू होईल. मात्र, दोन कोटींहून अधिक लोकसंख्येसाठी जीवन वाहिनी असणारी महामुंबईला सेवा देणारी लोकलसेवा कधी पूर्ण सुरू होणार, हा कळीचा प्रश्न आहे. ती सुरू न होण्यात करोनाचा दोष कमी आणि इतकी वर्षे सार्वजनिक वाहतुकीचे जाळे विस्तृत न करणाऱ्या सरकारांचा दोष अधिक आहे. एरवीही लोकलने सुखाने प्रवास करता येत नाही. शारीरिक अंतर वगैरे संकल्पनांचा तर काही संबंधच नसतो. नेमक्या याच कारणांमुळे मुंबईतला करोना आटोक्यात येत असला तरी लोकलसेवा सुरू करण्याचा विचार पुढे गेलेला दिसतो. त्यातली अटळता समजावून घ्यायला हवी. राज्य सरकारने आता मनोरंजन विश्वालाही अधिक मोकळे करावे. तसे झाले तर महाराष्ट्रातले काही लाख प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार पुन्हा मिळतील. देशाचा अर्थकारणाचा घसरलेला गाडा शेवटी मुंबई व महाराष्ट्रालाच सावरून धरायचा आहे. तेव्हा मुंबई व महाराष्ट्र पूर्ण करोनामुक्त होऊन आर्थिक आघाडीवर लढण्यास सज्ज होणे, नितांत आवश्यक आहे. म्हणूनच, 'संपूर्ण काळजी घेऊनच पूर्ववत व्यवहार' हे सूत्र कोणी चुकूनही विसरता कामा नये. मुंबई किंवा इतरत्रही एकही नवा करोनारुग्ण सापडला नाही तरी 'मास्क' वापरण्याचा नियम काही काळ राहील. त्याची वैद्यकीय कारणे आहेत. तीही समजावून घ्यावी लागतील. काही दिवसांपूर्वी, प्राणवायू, काही औषधे आणि रुग्णशय्या मिळवणे, हा रुग्णांच्या नातलगांसाठी कसोटीचा प्रसंग होता. आज तशी स्थिती नाही. राज्यभरातला ताण सैलावला आहे. या स्थितीत खरे आव्हान आहे ते लसीकरणाला वेग देण्याचे. लसीकरण जितक्या लवकर पुरे होईल, तितका तिसऱ्या संभाव्य लाटेचा तडाखा निसटता बसेल. महाराष्ट्रातील निर्बंध सैल होत असताना नव्या आर्थिक वर्षाचे दोन महिने गेले आहेत. नवे शैक्षणिक वर्ष सुरू होते आहे. तसेच, शेतीचा नवा हंगामही हाक घालतो आहे. मान्सून येतो आहे. अनेक अर्थांनी हा नवा डाव मांडला जातो आहे. मात्र, तो कुणाच्याही बेशिस्त वागण्याने, अतिउत्साहाने आणि करोनाने दिलेले धडे बेपर्वाईने विसरून गेल्याने उधळला जाता कामा नये. ही परतीची आश्वासक वाट आहे. ती जोमाने पण करोनाला नवी संधी न देणाऱ्या संयमाने चालावी लागणार आहे.

माथेरानमध्ये भाजप पक्षात प्रवेशाला सुरुवात

दै.रायगड नगरी । कर्जत

सध्या राजकीय वातावरणात सुध्दा ऐन पावसाळ्यात आलेला ढगाळपणा राजकारणात दूर झाला असून अंतर्गत द्वेषाचे आणि प्रतिष्ठेचा विषय बनलेले आकसी बुद्धीचे राजकारण सुरू झाले आहे.नगरपरिषदेच्या आगामी निवडणुका जेमतेम पाच महिन्यांवर येऊन ठेपल्या आहेत तत्पूर्वी सत्तेच्या समीकरणाने आपल्या बाजूने कौल दिलाच पाहिजे यासाठी भारतीय जनता पक्षाने सुध्दा आपली कंबर कसली असून नगरपरिषदेत आपली सत्ता स्थापन व्हावी यासाठी अन्य पक्षातील सदस्यांना आपल्या पक्षात खेचुन पक्षप्रवेश करण्याची एकप्रकारे स्पर्धा सुरू असल्याचे चित्र स्पष्ट दिसू लागले आहे. जवळपास बावीस वर्षांपेक्षाही अधिक काळ सत्तेत नसलेल्या काँग्रेस पक्षाने सर्व प्रभागातील विविध पक्षाच्या कार्यकर्त्यांना आपल्या गोटात खेचण्यासाठी यशस्वी झेप घेतली असून त्यांच्याच पावलावर पाऊल टाकत भाजपने सुध्दा पक्षप्रवेश करण्यासाठी मेहनत घेत आपली प्रतिष्ठा पणाला लावलेली नुकताच येथील नागरिकांना जीवनावश्यक वस्तूंचे किट वाटप करताना दिसून आली आहे.

माथेरान मधील शिवसेनेच्या एकूण दहा नगरसेवकांनी नगरपरिषदेत एकहाती सत्ता असताना सुध्दा निवडणुकीच्या तोंडावर पक्षातील अंतर्गत मतभेदांमुळे भाजप पक्षात प्रवेश केला आहे.त्यामुळे पुढील राजकीय समीकरण ढवळून निघाले आहे.दि.६ जून रोजी भाजप जिल्हाध्यक्ष तथा पनवेलचे विद्यमान आमदार प्रशांत ठाकूर, कर्जत तालुका भाजप अध्यक्ष मंगेश म्हसकर,माथेरान शहर अध्यक्ष विलास पाटील यांच्या नेतृत्वाखाली आणि प्रमुख उपस्थिती मध्ये गावातील नागरिकांना सरसकट जीवनावश्यक वस्तूंचे किट वाटप करण्यात आले यावेळी नव्याने प्रवेश केलेले नगरसेवक तसेच आजी माजी पदाधिकारी उपस्थित होते. परंतु प्रशांत दामले आणि मंगेश म्हसकर या दिग्गजांच्या उपस्थिती मध्ये केवळ तीन व्यक्तींचा भाजप मध्ये प्रवेश करण्यात आला आहे. सेनेतून भाजप मध्ये प्रवेश करणाऱ्या या नगरसेवकांनी निदान प्रत्येकी दोन कार्यकर्त्यांचा प्रवेश करून घेतला असता तर दोन अंकी सदस्य संख्या अभिप्रेत होती.

परंतु याबाबत आलेल्या पक्षश्रेष्ठींना काय बोध झाला असेल याचा अंदाज त्यांनाच आला असावा त्यामुळे आगामी निवडणुका लक्षात घेऊन या दहा नगरसेवकांवर मोठी जबाबदारी येऊन ठेपली असून यांना पुढील काळात प्रत्येक प्रभाग पिंजून काढावा लागणार आहे आणि भाजपची वाढती ताकद पक्षश्रेष्ठींना दाखवून द्यावी लागणार आहे.यासाठी उरलेल्या काही दिवसांत दिवसरात्र अपार कष्ट घेऊन निदान पक्ष प्रवेश करणा-यांची तीन अंकी संख्या प्राप्त करावी लागेल यात तीळमात्र शंका नाही असेही सुरू ऐकावयास मिळत आहेत.

फेसबुक लाईव्हद्वारे रायगडवासियांशी साधला संवाद

करोनाच्या संकटातून निश्चितपणे सुखरुप बाहेर पडू : पालकमंत्री आदिती तटकरे

दै.रायगड नगरी । अलिबाग

करोनाच्या आणि राज्यभरातील लॉकडाऊनच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्याच्या पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी आज (दि.७ जून) रोजी मंत्रालयातील त्यांच्या दालनातून फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून रायगडकर जनतेशी संवाद साधला.

आपण सर्वजण आत्मविश्वासाने व संयमाने या करोनाच्या संकटात गंभीर परिस्थितीचा सामना करीत आहोत. या चिंताजनक परिस्थितीतून आपण निश्चितपणे सुखरूप बाहेर पडू, असा विश्वास त्यांनी नेटकऱ्यांना दिला.

पालकमंत्री कु.आदिती तटकरे म्हणाल्या, पहिल्या व दुसऱ्या लाटेत कोविडचा प्रादूर्भाव वाढताना दिसला. आपण या दोन्ही टप्प्यांचा सर्वतोपरी मुकाबला करण्याचा प्रयत्न केला. मात्र आता अधिक सावधपणे तिसऱ्या लाटेपूर्वी आवश्यक ती सर्व तयारी ठेवणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने शासन आणि प्रशासन आरोग्य यंत्रणा अधिकाधिक बळकट करताना दिसत आहे. लसीकरणावरही जास्तीत जास्त भर दिला जात आहे. शासनाने नुकताच एकूण पाच स्तरांमधून कोविड निर्बंध उठविण्यासंदर्भात निर्णय घेतला आहे. रायगड जिल्हा चौथ्या स्तरात असून जिल्हा प्रशासनाने यासंदर्भात सविस्तर अधिसूचना काढली असून जिल्हा माहिती कार्यालयाच्या माध्यमातून, विविध प्रसार माध्यमांच्याद्वारे याची सविस्तर माहिती प्रसारित करण्यात आली आहे.

या फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून जनतेशी संवाद साधताना पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी कोविड प्रतिबंधक उपाययोजनांच्या पार्श्वभूमीवर नव्या निर्बंधाची सविस्तर माहिती दिली व जनतेला आवाहन केले की, समाजातील सेवाभावी संस्थांनी पुढे येवून शासन, प्रशासनास सहकार्य करावे. कोविड संदर्भात शासनाने घालून दिलेल्या नियमांचे सर्वांनी पालन करावे. शासन आणि प्रशासन जनतेसाठी सदैव तत्पर आहेच परंतु नागरिकांनीही शासन व प्रशासनास नियमांचे पालन करुन सहकार्य करावे.

त्या पुढे म्हणाल्या, नोकरीसाठी बाहेरगावी जाणाऱ्यांच्या लसीकरणास प्राधान्य देण्याचा निर्णय घेण्यात आला असून म्युकरमायकोसिसच्या रुग्णांवर शासकीय रुग्णालयात मोफत उपचार करण्याचा तर खाजगी रुग्णालयात शासनाने नेमून दिलेल्या दरानेच बिल आकारणी करण्याचा निर्णयही शासनाने घेतला आहे. मात्र एखाद्या रुग्णालयाबाबत कुणाची तक्रार असल्यास त्यांनी तात्काळ स्थानिक प्रशासनाशी संपर्क साधावा. करोनाच्या संभाव्य तिसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर लहान मुलांची काळजी घेण्यासाठी जिल्ह्यामध्ये विविध ठिकाणी जम्बो कोविड सेंटर तयार करण्यात येत आहेत. यात कळंबोली येथील ८०० बेडच्या कोविड सेंटरमध्ये लहान मुलांसाठी १०० आयसीयू बेड, अलिबाग जिल्हा सामान्य रुग्णालय येथील १०० बेडच्या कोविड सेंटरमध्ये लहान मुलांसाठी २० आयसीयू बेड, नागोठणे येथील रिलायन्स कंपनीच्या २५० बेडच्या कोविड सेंटरमध्ये लहान मुलांसाठी २५ आयसीयू बेड, माणगाव येथील कोविड सेंटरमध्ये लहान मुलांसाठी ५० आयसीयू बेड व जे.एस.डब्ल्यू येथील कोविड सेंटरमध्ये काही बेड लहान मुलांसाठी राखीव ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याचप्रमाणे जिल्ह्यातील प्रसिध्द बालरोगतज्ञांशी चर्चा करुन त्यांचा टास्क फोर्स तयार करण्यात आला आहे. लहान मुलांची काळजी घेण्यासाठी पालकांमध्ये तसेच जनतेमध्येही जनजागृती करण्यात येत आहे. त्यांचे विविध माध्यमातून समुपदेशन करण्यात येत आहे.

शेवटी पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी या संकटकालीन परिस्थितीत शासनाने लॉकडाऊन कालावधीतही दिलेल्या सवलतींचा जनतेने दुरुपयोग न करता स्वतःच्या, कुटुंबाच्या आणि समाजाच्या सुरक्षिततेसाठी प्रशासनाने सांगितलेल्या नियमांचे सर्वांनी काटेकोर पालन करावे, असे आवाहन करुन या संकटावर सर्वांनी मिळून मात करु, असा विश्वास व्यक्त केला.

रायगडवासियांशी पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून साधलेल्या या संवादाबाबत अनेक नेटकऱ्यांनी त्यांना ऑनलाईन धन्यवाद दिले, अनेकांनी पालकमंत्री या नात्याने कु. आदिती तटकरे करीत असलेल्या कामाबद्दल खुल्या दिलाने प्रशंसा केली तर काहींनी कोविडच्या तसेच मान्सूनपूर्व कामाच्याबाबतीत मौलिक सूचनाही दिल्या.

हे फेसबुक लाईव्ह जिल्हा माहिती कार्यालयाच्या ट्विटर व फेसबुक अकाऊंटलाही लिंक करण्यात आले होते. त्यामुळे जिल्ह्यातील अनेक नागरिकांना पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या या फेसबुकलाईव्हशी कनेक्ट होता आले व त्यांना जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांच्या संवादाचा थेट लाभही घेता आला.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त गिरवले ग्रामपंचायतीतर्फे वृक्षारोपणाचा कार्यक्रम करण्यात आला. यावेळी सरपंच अनिता गायकर, सामाजिक कार्यकर्ते अशोक गायकर, ग्रामसेवक सुरेश मोहिते, वासंती हातमोडे, पुनम चौधरी उपस्थित होते.

सुधागड मनसेतर्फे चव्हाणवाडी गावात वृक्षारोपण मोहीम

दै.रायगड नगरी । सुधागड/पाली

सुधागड तालुक्यातील चंदरगाव ग्रामपंचायत हद्दीतील चव्हाणवाडी गावात जागतिक पर्यावरण दिनानिमित्त मनसेतर्फे वृक्षारोपण मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत गावातील महिला व तरुणांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला. मनसे सुधागड तालुका अध्यक्ष सुनिल साठे यांच्या मार्गदर्शनाखाली विभाग अध्यक्ष केवल चव्हाण यांच्या सहकार्याने ग्रामस्थांच्या उपस्थितीत हा उपक्रम राबवण्यात आला. पर्यावरणाचे महत्व प्रत्येकाला समजावे व पर्यावरण संवर्धन व्हावे या उद्देशाने ही मोहीम राबविण्यात आली. असे विभाग अध्यक्ष केवल चव्हाण यांनी सांगितले. या मोहिमेत विभाग अध्यक्ष केवल चव्हाण, परेश वनगळे, प्रदिप जोध, विजय चव्हाण, हेमंत गोरिवले, मुकेश चव्हाण, नितीन पाटेकर व ग्रामस्थ सहभागी झाले होते.

हरिहरेश्वर येथील एटीएम बंद बँकिंग सुविधा नसल्याने नागरिकांना मानसिक त्रास

दै.रायगड नगरी । शिस्ते

श्रीवर्धन तालुक्यातील हरिहरेश्वर येथील भागात जवळपास बँक ऑफ इंडिया या राष्ट्रीयकृत बँकेची एटीएम मशीनची सुविधा उपलब्ध दिली आहे मात्र ग्राहकांना एटीएम ची चांगली सेवा देण्याकडे मात्र या बँकेचे दुर्लक्ष होत आहे. तांत्रिक बिघाड , नेटवर्क चे प्रश्न , लिंक फेल आणि पुरेशा रक्कमेअभावी वांरवार एटीएम मशिन बंद असल्यामुळे ऐन लॉकडाऊन काळात कोरोना सारख्या संसर्गजन्य महामारी च्या दिवसांत ग्राहकांची गैरसोय होत आहे.

हरिहरेश्वर, बागमांडला परिसरातील जवळपास दांडा, भेन्ड्खोल, कोंडी, साक्षीभैरी, देवघर, हरेश्वर, मारळ, आगर, काळीजे, सायगाव अशा गावांचे व्यवहार आणि बाजारपेठेत खरेदीसाठी नागरिकांची धावपळ गर्दी पाहायला मिळते. हरिहरेश्वर मध्ये एटीएम मशिन आहे मात्र , बहुतेक वेळी टीएम मशीन शोभेची वस्तू बनून राहते . धावपळीच्या युगात आणि त्यातच कोरोनाजन्य परिस्थितीत रांगेत उभे राहून बँकेतून पैसे काढण्यासाठी बहुतांश नागरिकांकडे वेळ नाही . याशिवाय नोटाबंदीनंतर एकीकडे कॅशलेस व्यवहारांचा वापर वाढावा , यासाठी सरकारकडून धोरणे आखली जात असली तरीही प्रत्यक्षात कॅशलेस एटीएम मशिन मात्र फार दूर असल्याचे चित्र हरिहरेश्वर व बागमांडला शहरात व ग्रामीण भागात दिसून येत आहे . मागील काही काळात नव्याचे नऊ दिवस प्रमाणे बँकांनी चांगल्याप्रकारे नागरिकांना सेवा दिल्या होत्या , परंतु कालांतराने बँकांच्या सेवेत बऱ्याच त्रुटी निर्माण झाल्या , त्यामुळे हरिहरेश्वर येथील बँकांच्या 'एटीएम मशिन सेवा' सेवा नसून खेळ खंडोबा अशीच झाली आहे. एटीएम मशीन बंद , बँकेतील असुविधा अधिकारी , कर्मचाऱ्यांची उदासीनता यामुळे ग्राहकांची तारांबळ उडाली आहे . अशातच तक्रारी करूनही काही उपयोग होत नसल्याने होत असलेल्या परिस्थित व्यवहार पार पाडण्याशिवाय पर्याय राहिलेला नाही, असे शहरातील त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील नागरिकांचे म्हणणे आहे . तरी याकडे एटीएम संबंधित बँकांचे अधिकारी , कर्मचारी लक्ष देत असुविधा दुर करावी आणि पुर्ववत एटीएम मशीन सुरू करावी , अशी हरिहरेश्वर परिसरातील नागरिकांची मागणी होत आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

रायगड जिल्ह्यात चार दिवस अतिवृष्टीचा इशारा

ऑक्सीजनचा पुरवठा खंडीत होणार नाही या विषयी दक्षता घेण्याचा सूचना वैद्यकिय आरोग्य विभागास देण्यात आल्या आहेत.

आपत्ती काळात रस्त्यांवरील झाडांच्या फांद्या, झाडे बाजूला काढण्यासाठी आवश्यक मशिनरी, जे.सी.बी.,पोकलन, क्रेन, वूड कटर, अशा सर्व सामुग्रीचे नियोजन करण्याचे आदेश वृक्ष प्राधिकरण विभागास देण्यात आले आहेत. सखल भागातील साठलेले पाणी निचरा करण्यासाठीचे उपाययोजना ,नदी जवळील क्षेत्रात पाणी वाहते राहण्यासाठीची यंत्रणा,बोटी अशा सर्व गोष्टी सज्ज करण्याविषयीचे निर्देश संबधित विभागांना देण्यात आले आहेत.

धोकादायक इमारती, जुनी घरे, रासायनिक उद्योग, कच्च्या घरात राहणारे नागरिक, जनावरे यांना सुरक्षित ठिकाणी नेण्याची व्यवस्था करण्याबाबत आवश्यक त्या सूचना आयुक्तांनी आपत्ती व्यवस्थापन करणाऱ्या अधिकारी वर्गास तसेच प्रभाग अधिकारी यांना दिल्या आहेत.

अतिवृष्टी काळात पाणी पुरवठा सुरळित राहण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे, गरज पडल्यास टँकरची सुविधा उपलब्ध करण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या आहेत.

भुसंपादनाच्या मोजणीला शेतकऱ्यांचा विरोध

पेण येथे शेतकऱ्यांनी नोदविल्या असताना देखील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे अधिकारी मनमोहन राणे व भुमिआभिलेखचे अधिकारी येथे मोजणीसाठी आले असता आम्हाला विश्वासात न घेता हा प्रकल्प लादला असल्यामुळे या प्रकल्पाला आमचा विरोध असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले व मोजणीस विरोध केला असता उपविभागिय अधिकारी विठ्ठल ईनामदार या ठिकाणी आले व शेतक-याशी संवाद साधला असता ही प्राथमिक मोजणी आहे. मोजणी झाल्यावर जमिनीचा दर ठरवला जातो. शेतकऱ्यांना विचारात घेतले शिवाय जमिन घेतली जाणार नाही असे सांगितले. परंतु हा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचा प्रकल्प नको अशी मागणी शेतकऱ्यांनी केली असता तुमची मागणी शासनाला कळवितो असे उपविभागिय अधिकारी विठ्ठल ईनामदार यांनी यावेळी सांगितले. यावेळी आई आकादेवी प्रकल्पग्रस्त शेतकरी सामाजिक संस्था गडब अध्यक्ष विजय पाटील, धायरेश्वर शेतकरी संघटना डोलवी अध्यक्ष गजानन पेढवी, दिलिप पाटील, प्रमोद पाटील, काशिनाथ म्हात्रे, जनार्दन पाटील, सिताराम चवरकर, दिनेश म्हात्रे, मिलिंद पाटील, कमलाकर पाटील सुशिल कोठेकर, दिगंबर पाटील, गजानन मोकल, वासुदेव पाटील, गणपत पाटील अभिजित पाटील आदि शेतकऱ्यासह महिला उपस्थित होत्या.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, श्री.उदय बामा पाटील, रा.वावंजे, ता.पनवेल यांचे मालकीची, वहिवाटीची व कसवणुकीतील पुढीलप्रमाणे वर्णनाची शेतजमीन मिळकत आमचे अशिलांनी त्यांचेकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे : निताळे, ता.पनवेल, जि.रायगड येथील

अ.क्र.	गट क्र.	उपविभाग	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रु.पै.
१	३६	३	०-४६-४० पैकी ०-१०-० इतके क्षेत्र खरेदीचा विषय आहे	

सदर मिळकतीमध्ये अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यु., हुकूमनामा, मनाई आदेश, वहिवाट, हिस्सा अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारास कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर भूखंडावरील श्री.उदय बामा पाटील यांचे मालकी हक्क हितसंबंध निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत, हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि.०७/०६/२०२१

सही/-
श्री.सचिन पुंडलिक केणी
ॲडव्होकेट
शॉप नं.१४, तळमजला, प्लॉट क्र.१०७ ए, आशियाना को.ऑप.हौ.सो.लि., जिल्हा न्यायालय पनवेल जवळ, पनवेल ४१०२०६, जि.रायगड मो.९९२०९७३४६७

सौ.गोडसे मॅडम कोर्ट

सचिन कोंडीराम भोसले
वादीतर्फे वकील

जाहीर नोटीस

पनवेल येथील सह दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांच्या न्यायालयात
स्पे.म.क्र.२१७/०२०
नि.नं.६/ड
ने.ता.२३/०८/२०२१

कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल
तळमजला, शॉप नं.१/२, मारुती अपार्टमेंट, टिळक रोड,
ता.पनवेल, जि.रायगड, पनवेल-४१०२०६ वादी

विरुद्ध

प्रति,
विकास मोहन धोत्रे
पत्ता : फ्लॅट नं.३०१, विजया हेरिटेज,
तिसरा मजला, प्लॉट नं.१६, सेक्टर ३४/अे,
ओवे, खारघर, नवी मुंबई प्रतिवादी

ज्याअर्थी तुम्हाला जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, वादी यांनी तुमच्या विरुद्ध या न्यायालयात दावा दाखल केला आहे. म्हणून सदर दाव्याच्या संबंधात आपले म्हणणे मांडण्यासाठी दि.२३/०८/२०२१ रोजी सकाळी ठिक १०.३० वाजता या न्यायालयात आपण जातीने किंवा ज्यास यांच्या योग्य सूचना दिलेल्या असून जे वादासंबंधीच्या सर्व महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे देवू शकणारी व्यक्ती त्यांच्या बरोबर असेल अशा वकीलांमार्फत हजर होण्यासाठी तुम्हाला याद्वारे बोलाविण्यात येत आहे व तुमच्या हजेरीसाठी ठरलेल्या दिवशी वादाच्या अंतिम निर्णयासाठी नेमलेला दिवस असल्यामुळे बचावाच्या पृष्ट्यार्थ तुम्ही ज्या साक्षीदारांच्या साक्षीच्या व ज्या दस्तऐवजाचा आधार घेवून इच्छितो ते सर्व साक्षीदार व सर्व दस्तऐवज त्या दिवशी हजर करण्याची तुम्हाला तयारी ठेवावी लागेल.

तुम्हाला या जाहीर नोटीस देण्यात येत आहे की, उपरोक्त दिवशी हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत वादाची सुनावणी होवून निर्णय दिला जाईल याची दखल घ्यावी.

तसेच तुम्हाला अशीही नोटीस देण्यात येत आहे की, उपरोक्त दिनांकास किंवा तत्पूर्वी तुम्ही बजावणीसाठी तुमचा पत्ता दाखल न केल्यास तुमचा जबाब रद्द होण्यास पात्र ठरेल.

आज दि.०७/०६/२०२१ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहाय्यक अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले. दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

संक्षिप्त...

सोसायटीचे अध्यक्षने केला १६ वर्षीय मुलीचा विनयभंग

दै.रायगड नगरी । पनवेल

तालुक्यातील एका गावातील सोसायटीच्या अध्यक्षने सहा वर्षीय मुलीचा विनयभंग केला आहे. आरोपी विरोधात तालुका पोलीस ठाण्यात विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला न्यायालयात हजर केले असता आठ जूनपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. १६ वर्षीय पीडित तरुणीचे मित्रासोबत बोलताना फोटो काढून तिला वडिलांना दखविण्याची धमकी दिली आणि तिला वर टेरेस वर बोलावून आरोपीने तीचा विनयभंग केला. आणि सदर प्रकार कोणाला न सांगण्याची धमकी दिली. मुलीने या प्रकाराची माहिती घरी सांगितली असता तालुका पोलीस ठाण्यात आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

पनवेल परिसरातून महिला बेपत्ता

दै.रायगड नगरी । पनवेल

राहत्या घरामध्ये वाशी येथे कामाला जाते असे सांगून घराबाहेर पडलेली एक महिला अद्याप घरी न परतल्याने ती हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. झरीना अकमल पटेल (वय-३५) असे या महिलेचे नाव असून रंग गोरा, उंची ४ फूट ४ इंच, अंगाने मजबूत, चेहरा गोल, नाक सरळ, डोक्यावरील केस काळे व लांब, उजव्या हाताला फूलपाखराचे चित्र गोंदलेले मनगटाच्या पाठीमागे, अंगात काळ्या रंगाचा पायजमा व कुर्ती फिक्कट गुलाबी रंगाचा, तिला मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराती अशा भाषा अवगत आहे. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलिस ठाणे दुरध्वनी-२७४५२३३३ किंवा पोलिस हवालदार एस.एम. फाळके यांच्याशी संपर्क साधावा.

अलिबाग जिल्हा न्यायालयाच्या आवारात वृक्षारोपण संपन्न

दै.रायगड नगरी । अलिबाग

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण रायगड-अलिबाग, जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग व अलिबाग वकील संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती विभा इंगळे यांच्या हस्ते अलिबाग जिल्हा न्यायालयीन परिसरात जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी जिल्हा न्यायाधीश-१ श्री.भिलारे, जिल्हा न्यायाधीश-२ श्री.थत्ते, जिल्हा न्यायाधीश-३ श्री.मलशेट्टी, तदर्थ न्यायाधीश श्री.मोहिते, सचिव संदीप स्वामी, वकील संघटनेचे सदस्य श्री. बंगेरा, सर्व न्यायिक अधिकारी, न्यायालय व्यवस्थापक, कर्मचारी उपस्थित होते.

दोन्ही पालक मयत झालेल्या कुटुंबांना जिल्हाधिकारी निधी चौधरी यांच्या हस्ते कोरडे अन्नधान्य वाटप

दै.रायगड नगरी । अलिबाग

कोविडमुळे दोन्ही पालक गमावलेल्या बालकांची स्थिती अत्यंत हालाखीची असून शासनाची मदत येईपर्यंत या कुटुंबांना तातडीची मदत देणे आवश्यक असल्याने जिल्ह्यातील दानशूर व्यक्ती व स्वयंसेवी संस्था यांनी मदत करण्याबाबतचे आवाहन रायगड जिल्हा टास्क फोर्सच्या (दि.०२ जून) रोजीच्या ऑनलाईन बैठकीमध्ये जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी केले होते.

या आवाहनास प्रतिसाद देऊन एस.ओ. एस.चिल्ड्रन्स व्हिलेज इंडिया या स्वयंसेवी संस्थेने अशा संकटात सापडलेल्या २०० कुटुंबांकरिता अन्नधान्याचे २०० किट जिल्हाधिकारी निधी चौधरी यांच्याकडे आज जिल्हाधिकारी कार्यालयात सुपूर्द केले. लाभार्थी बालक सानिका परशुराम थळे हिला जिल्हाधिकारी निधी चौधरी यांच्या हस्ते मदतीचे वाटप करण्यात आले व त्यानंतर मदत साहित्याच्या गाडीला जिल्हाधिकारी यांनी हिरवा झेंडा दाखवून ही गाडी साहित्य वाटपाकरीता जिल्ह्यात रवाना झाली.

यावेळी जिल्हा परिविक्षा अधिकारी, जिल्हा महिला व बाल विकास, श्री.अशोक पाटील, एस. ओ. एस. बालगृह सोगाव चे संचालक श्री. राकेश सिन्हा, प्रकल्प प्रमुख श्री. पठाण रियाज खान, श्री. संजय काचरे, राजेंद्र मोहन्ती, अमित नागरे, वैभव घाडगे, समुपदेशक अजिनाथ काळे व जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे डाटा एन्ट्री ऑपरेटर संदिप गवारे हे उपस्थित होते.

रायगड जिल्हा टास्क फोर्स च्या दि. ०२ जून २०२१ रोजीच्या ऑनलाईन बैठकीमध्ये जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी कोविड मध्ये दोन्ही अथवा एक 'मयत झालेल्या बालकांचा शोध घेण्याचे काम जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, चाईल्ड लाईन, रायगड जिल्हा परिषद व पनवेल महानगरपालिका या यंत्रणांमार्फत सुरु आहे. यामध्ये बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण व शहरी) यांच्या माध्यमातून जिल्हयातील अंगणवाडी सेविका, मुख्य सेविका यांच्यामार्फत जिल्हयातील अशा प्रकारच्या बालकांची माहिती जिल्हा प्रशासनास मिळाल्यास या बालकांना केंद्र व राज्य शासनाच्या आर्थिक लाभाच्या योजनेचा तसेच कोविडमुळे विधवा झालेल्या महिलांना इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन, संजय गांधी निराधार योजना व राष्ट्रीय कुटूंब लाभ योजनेंर्तगत एकाच वेळी रु.२० हजार इतक्या अनुदानाचा लाभ दिला जाईल, असे सांगितले. तसेच जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी निराधार बालकांना त्यांच्या वयाच्या १८ वर्षापर्यंत बाल संगोपन योजनेंतर्गत दरमहा रु. १ हजार १२५ इतका लाभ मिळवून देण्याबाबत, अशा निराधार मुलांचे आर्थिक हक्क व शैक्षणिक हक्क अबाधित राहण्याकरीता जिल्हा विधी सेवा प्राधिकरणने संबंधित कुटुंबांना भेट देऊन योग्य ती कार्यवाही करावी, तसेच जिल्हा माहिती अधिकारी यांनी या योजनेची माहिती जास्तीत जास्त नागरिकापर्यंत पोहचवावी, असे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देवून जिल्हयातील नागरिकांनी कोविड आजाराने दोन्ही पालक गमावलेल्या बालकांची माहिती १०९८ या बालकांच्या हेल्पलाईनवर उपलब्ध करुन देऊन शासनास जास्तीत जास्त सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे.

या ऑनलाईन बैठकीस जिल्हा बालकल्याण समितीचे अध्यक्ष तानाजी पाटील, जिल्हा विधी प्राधिकरणाचे सचिव संदिप स्वामी, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुहास माने, जिल्हा आरोग्य अधिकारी सुधाकर मोरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी नितीन मंडलिक,जिल्हा परिविक्षा अधिकारी अशोक पाटील, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी सुजाता सकपाळ, जिल्ह्यातील बालगृहांचे अधीक्षक, चाईल्ड लाईन संस्थेचे अमोल जाधव आदि उपस्थित होते.

मुरुडमध्ये रानभाज्यांची आवक सुरु ; औषधी गुणधर्मांमुळे बाजारात मागणी

दै.रायगड नगरी । मुरुड

हवामान खात्याने साधारण ८ ते १० जून पासून पाऊस कोकणात दाखल होईल असा अंदाज वर्तवला होता परंतु साधारण तीन चार दिवस आधीच पावसाळा सुरु झाल्याने मुरुड बाजारपेठेत रानभाज्या विक्रीसाठी येण्यास सुरुवात झाली आहे.

मुंबई वाशी, पुणे येथून येणाऱ्या भाज्यांच्या किमतीत नैसर्गिक संकटांमुळे ३० ते ४० टक्के वाढ झाली आहे त्यामुळे व भारंग, कुड्याच्या शेंगा, आळंबी, टाकळा, करक इत्यादी रानभाज्यांमध्ये एक प्रकारची विशिष्ट चव तसेच त्यांच्यामध्ये असणारे औषधी गुण यामुळे या भाज्यांना बाजारात मोठ्या प्रमाणात मागणी आहे. पावसाळा सुरु होताच जंगलामध्ये या भाज्या नैसर्गिकरित्या उगवतात तसेच मुरुड तालुक्यालगत मोठ्या प्रमाणात जंगली भाग असल्याने या भाज्या भरपूर प्रमाणात मिळतात. मुरुड तालुक्यातील आदिवासी समाज या भाज्या विक्रीसाठी बाजारात आणत असून यापासून त्यांना रोजगार प्राप्त होतो व त्यांचा तात्पुरता उदरनिर्वाहाचा प्रश्न सुटतो. तसेच मुरुड मधील खारआंबोली, वाणदे परिसरातील शेतकरी वालाची शेती मोठ्या प्रमाणात करतात, ते वाल तयार झाल्यानंतर काढताना त्यातील वाल शेतात पडतो तो पावसाळा सुरु होताच रुजण्यास सुरवात होते त्या रुजलेल्या वालांची भाजी सुद्धा या दिवसात बाजारात विक्रीसाठी येते त्या रुचकर भाजीलाही बाजारात प्रचंड मागणी आहे.

उरण शहरातील मुस्लिम कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश

दै.रायगड नगरी । उरण

मुख्यमंत्री व शिवसेना पक्षप्रमुख उध्द-वसाहेब ठाकरे यांच्या कार्यप्रणाली वर विश्वास ठेऊन तसेच शिवसेना जिल्हाप्रमुख व माजी आमदार मनोहरशेठ भोईर व शिवसेना गटनेते गणेश शिंदे यांनी कोरोना महामारीत केलेल्या सामाजिक कार्य, आरोग्य विषयक कार्य व रक्तदान शिबिरे आशा विविध कार्याने प्रभावित होऊन रविवार दिनांक ०६ जून २०२१ रोजी उरण शहरातील मुस्लिम व ख्रिश्चन कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला.

शिवसेना जिल्हाप्रमुख व माजी आमदा मनोहरशेठ भोईर यांच्या नेतृत्वाखाली व अल्पसंख्याक सेलचे उरण तालुका अध्यक्ष व माजी नगरसेवक झहीर कुरेशी यांच्या प्रयत्नाने हा प्रवेश सोहळा पार पडला. प्रवेश करण्यामध्ये ओबेद बक्षी, यासिन मुकादम, कफीद अन्सारी, अकील अन्सारी, वसील अन्सारी, नदीम कर्वे कर, मतीन शेख, बशीर शेख, हुसेन शेख, शाने अहम्मद शेख, हमजा खतीब, लुकास फर्नांडिस, बद्दरुद्दीन फसाटे, सरफराज शेख, जुल्फिकार तुंगेकर, गुफरान शेख, अखिल शेख, शेहनबाज खान, मेहराज शेख, आसिफ कसाई, अब्बास बिबरी, खान आयुब, इमरान अहमद, उपमिर सिद्धीक्की, नबी मुजावर, लतीफ राज, फजल अन्सारी, सुभाष पाटील, जमीर बसिर सय्यद, इबेन हसन अस्नारी, अकील भाई, लुकमान पेंटर, इशरत शेख, शान अहमद खान, अनिता पाटील, शाबीर केलकर, नबी हसन अन्सारी, मोहम्मद भाई, रझाक शेख आदींनी आपल्या परिवारासह शिवसेनेत प्रवेश केला.

यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख व माजी आमदार मनोहरशेठ भोईर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना शिवसेना जातीपातीचे राजकारण करत नाही. येणाऱ्या उरण नगरपालिका निवडणुकीमध्ये शिवसेना मुस्लिम समाजाचा योग्य सन्मान करेल असा विश्वास व्यक्त केला. तसेच तालुकाप्रमुख संतोष ठाकूर व गटनेते गणेश शिंदे यांनी मार्गदर्शन करून सर्वांचे शिवसेनेत स्वागत केले.

सदर पक्ष प्रवेशाच्या वेळी कामगार नेते महादेव घरत, उरण शहर संपर्क प्रमुख गणेश म्हात्रे, उपतालुका संघटक के एम घरत, अल्पसंख्याक सेलचे उरण विधानसभा अध्यक्ष एजाज मुकादम, सय्यद मुस्तफा, इरफान पठाण,डोंगरी शाखाप्रमुख सचिन पाटील, कासमभाट शाखाप्रमुख प्रदीप शेळके व कार्यकर्ते उपस्थित होते.

पर्यावरण प्रेमी प्रतिष्ठानतर्फे गडब येथे वृक्षारोपण

दै.रायगड नगरी । पेण

जागतिक पर्यावरन दिन, शिवस्वराज्य दिनाचे औचित्य साधुन पेण तालुक्यातील गडब येथे पर्यवरण प्रेमी प्रतिष्ठान तर्फे वृक्षारोपण करण्यात आले.

पेण तालुक्यातील गडब परिसरात वाढते औद्योगिकरण पाहता येथील येथील पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी गडब परिसरातील पर्यावरण प्रेमी तरुणांनी एकत्र येत पर्यावरण प्रेमी प्रतिष्ठान गडब ची स्थापना केली असुन या प्रतिष्ठान तर्फे रोपवाटीका तयार करणे, वृक्षारोपण करणे, मागेल त्याला रोप देणे, वृक्षाचे संगोपन करणे आदि उपक्रम राबविण्यात येत असुन, पर्यावरणाचा समतोल राखण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. पर्यावरण दिन, शिवस्वराज्य दिनाचे औचित्य साधुन गडब येथे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी पेण पंचायत समिती सदस्य, शिवसेना उपजिल्हा प्रमुख नरेश गांवड, गडब सरपंच अर्पणा कोठेकर, माजी उपसरपंच तुलशिदास कोठेकर, ग्रामपंचायत सदस्य लक्ष्मण कोठेकर, पर्यावण प्रेमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष दिनेश म्हात्रे, प्रवक्ते सदानंद ठाकुर, सतिष म्हात्रे, संदिप म्हात्रे, अंकुश वाघमारे, महेश वाघमारे, संदिप कडु अभिजित पाटील, दिगंबर पाटील, गजानन पाटील, बबन पाटील, आदि उपस्थित होते. पर्यावरणाचा समतोल राखणे गरजेचे आहे, यासाठी येथील तरुणांनी एकत्र येत पर्यावरण प्रेमी प्रतिष्ठानची स्थापना केली ही अभिमानास्पद गोष्ट आहे. सर्वांनी जास्तीत जास्त झाडे लावुन त्याचे संगोपन करणे ही आपली प्रेत्येकांची जबाबदारी असल्याचे पेण पंचायत समितीचे सदस्य शिवसेना उपजिल्हा प्रमुख नरेश गांवड यांनी सांगितले.

पनवेलमध्ये घरातील दागिने केले लंपास

दै.रायगड नगरी । पनवेल

बंद घराच्या दरवाजाची कडी उघडून अज्ञात चोरट्यांनी ब्लाऊजमधील पर्समध्ये ठेवलेले रोख रकमेसह दागिने लबाडीने चोरून नेल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे. फातिमा शेख (रा.-इस्माईल पटेल चाळ) यांच्या बंद घराच्या दरवाजाची कडी उघडून अज्ञात चोरट्यांनी घरातील २७ हजार रूपये रोख व इतर सोन्याचे दागिने असा मिळून जवळपास ६७ हजारांचा ऐवज चोरल्याची तक्रार पनवेल शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

नागोठण्यात ८४ जणांची अँटीजेन तपासणी

दै.रायगड नगरी । वाकण

नागोठण्यातील गजबजलेला नाका असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे सोमवारी (दि.७) सकाळी ११ ते दुपारी १.३० वा. च्या दरम्यान नागोठणे पोलिसांकडून नाकाबंदी करण्यात आली. यामध्ये नागोठण्यात विनाकारण फिरणा-या ८४ जणांना नागोठणे पोलिसांकडून ताब्यात घेण्यात आले. या सर्वांची अँटीजेन तपासणी नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रृती मोरे व प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचारी वर्ग यांच्याकडन शिवाजी चौकातच करण्यात आली. या चाचणीत एक पुरुष पॉझिटिव्ह आढळून आला. पॉझिटिव्ह आढळून आलेल्या पुरुषाला पुढील कार्यवाही करण्यासाठी आरोग्य विभागाकडे सोपविण्यात आले असल्याची माहिती नागोठणे पोलिस ठाण्यातील हेड कॉन्स्टेबल निलेश महाडिक यांनी दिली.

जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, कल्पेश मनोहर घरत, मनिषा मनोहर घरत, अशोक तुकाराम घरत, सुलोचना चंद्रकांत पाटील व वनिता सुर्यकांत पाटील, रा.खोपटे (कचेरपाडा) यांच्या सामाईक मालकीची, वहिवाटीची व ताबेकब्जात असलेली खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे : खोपटे (कचेरपाडा), ता.उरण, जि.रायगड

अ.क्र.	गावाचे नांव	सर्व्हे नं.	हि.नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रु.पै.
१	खोपटे (कचेरपाडा), ता.उरण	५१	५/बी/१	०-२३-१० पो.ख.०-०२-६० एकूण ०-२५-७०	२.९१

कल्पेश मनोहर घरत, मनिषा मनोहर घरत, अशोक तुकाराम घरत, सुलोचना चंद्रकांत पाटील व वनिता सुर्यकांत पाटील यांच्या सामाईक मालकीची असून सदर मालकांपैकी श्री.अशोक तुकाराम घरत यांना त्यांच्या हिश्श्याची मिळकत आमचे अशिलांना नोंदणीकृत खरेदीखताने/करारनाम्याने विकत घेण्याचे निश्चित केले आहे. सदरील मिळकत निर्वेध व निजोखमीची असल्याचा व आमचे अशिलांना विकण्याचा हक्क व अधिकार त्यांना असल्याचा निर्वाळा त्यांनी आमचे अशिलांना दिला आहे. त्याप्रमाणे आमचे अशिलांबरोबर सदर शेतजमीन मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

सबब या जाहीर नोटीसीने तमाम लोकांना कळविण्यात येते की, सदर मिळकतीवर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु., वा तत्सम कोणतेही दावे, मालकी वा अन्य हक्कहितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०८ दिवसाचे आत आपल्या हक्कहितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणारे यांचे पत्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरल मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाहीत असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे विक्रीच्या कराराचे / खरेदीखताचे व हस्तांतरणाचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे व हरकती यांचा विचार करण्यात येणार नाही. सदर तक्रारी, दावे वा हरकती या रद्दबातल आहेत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

दि.०५/०६/२०२१

सही/-
ॲड.शिवराज गणपतराव राणे
ॲडव्होकेट हायकोर्ट
सावली रो-हाऊस, प्लॉट-अे/२१,
सेक्टर ६, नवीन पनवेल-४१०२०६
मो.नं.८३६९४७९५३७

महाराष्ट्र शासन

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
ठाणे विद्युत विभाग, सा.बां.विभाग, सा.बां.परिसर,
मराठी ग्रंथ संग्रहालयाजवळ, स्टेशन रोड,
ठाणे (पश्चिम) पिन कोड-४००६०१

जा.क्र.काअ/ठाविवि/निविदा-१/२०२५/सन २०२१ **दिनांक ०१ जून २०२१**

निविदा सूचना क्र.१५ सन २०२१-२०२२

संदर्भ : १) महाराष्ट्र शासन सा.बां.विभाग, मंत्रालय मुंबई, शासन निर्णय क्र.सीटी/२०१७/प्र.क्र.८/इमारती-२ दिनांक २७ सप्टेंबर २०१८

कार्यकारी अभियंता, ठाणे विद्युत विभाग, सा.बां.विभाग, परिसर, ठाणे (पश्चिम), दूरध्वनी क्र. (०२२) २५३३३१४४ हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून योग्य वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून खालील कामाकरिता ब-१ नमुन्यातील टक्केवारी दर (Percentage Rate) ई-निविदा (ऑनलाईन) प्रणालीद्वारे निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, ठाणे विद्युत विभाग, सा.बां.विभाग, सा.बां.परिसर, ठाणे (पश्चिम), दूरध्वनी क्र. (०२२) २५३३३१४४ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

अ. क्र	कामाचे नाव	कामाची अंजित रक्कम रु.	ई-निविदा उपलब्ध कालावधी	निविदापूर्व बैठक/ठेकेदारांचा वर्ग/इसारा रक्कम/ कोरा निविदा शुल्क	ई-निविदा उघडणे
१	Est. No. : OW/PESD/763/2020-21 Providing EI, Compound Light, AC, LA wiring & Water Cooler in ADR Center at District Court Alibag, Tal-Alibag, Dist-Raigad	Rs 12,35,514/-	दि.०८/०६/२०२१ सकाळी १०.०० वाजेपासून दि.२२/०६/२०२१ सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत	निविदापूर्व बैठक नाही ठेकेदारांचा वर्ग-ब-१ व त्यावरील नोंदणीकृत विद्युत ठेकेदार ज्यांना अशा प्रकारचे काम केल्याचा अनुभव आहे. इसारा रक्कम रु.१२,४००/- निविदा शुल्क रु.५००/- अधिक वस्तू व सेवा कर	दि.२५/०६/२०२१ सकाळी ११.००
२	Est. No. : PESD/ Mahad /4801/2021-22 Providing 62.5 Kva DG Set at Sub Dist. Hospital Shriwardhan for Covid-19, Tal-Shriwardhan Dist-Raigad	Rs 8,99,392/-	दि.०८/०६/२०२१ सकाळी १०.०० वाजेपासून दि.२२/०६/२०२१ सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत	निविदापूर्व बैठक नाही ठेकेदारांचा वर्ग-क व त्यावरील नोंदणीकृत विद्युत ठेकेदार ज्यांना अशा प्रकारचे काम केल्याचा अनुभव आहे. इसारा रक्कम रु.९,०००/- निविदा शुल्क रु.५००/- अधिक वस्तू व सेवा कर	दि.२५/०६/२०२१ सकाळी ११.००

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१) https://mahapwd.com
२) https://mahatenders.gov.in (सदर निविदासुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३) कार्यकारी अभियंता, ठाणे विद्युत विभाग, सा.बां.विभाग, सा.बां.परिसर, ठाणे (पश्चिम), दूरध्वनी क्र.(०२२) २५३३३१४४ कार्यालयातील सूचना फलक.
४) वरील कामांकरिता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्यामध्ये नोंदणीकृत विद्युत ठेकेदार व उद्योग, ऊर्जा, कामगार विभागाकडील विद्युत अनुज्ञाप्तीधारक विद्युत ठेकेदार यासह ज्यांना तत्सम प्रकारचे काम यशस्वीपणे पुर्ण केल्याचा अनुभव आहे असे कंत्राटदार निविदा सादर करू शकतात.

सही/-
(प्र.अ.दोडे)
कार्यकारी अभियंता (विद्युत)
ठाणे विद्युत विभाग, सा.बां.विभाग, ठाणे

क्र.जिमाका/राअ/जाहि/३९/२०२१-२२

संक्षिप्त...

सासु, पती, नणंदेकडून महिलेला मारहाण, गुन्हा दाखल

दै.रायगड नगरी । पनवेल

घरातील किरकोळ कारणावरून वेळोवेळी मानसिक छळवणूक आणि शिवीगाळ केल्याप्रकरणी महिलेची सासु, पती आणि नणंदे विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मोरबे येथील द्वारका सहकारी गृहनिर्माण सोसायटीत राहणाऱ्या प्रमोदिनी मनोज जगताप (वय ३१) यांचे मनोज जगताप यांच्याशी लग्न झाले. २०१३ पासून ते आज पर्यंत फिर्यादी प्रमोदिनी यांचे पत्ती मनोज, सासु जिजाबाई आणि ननंद अनिता हे घरातील किरकोळ कारणावरून त्यांना वेळोवेळी मानसिक छळवणूक करून शिवीगाळ करतात. आणि पतीने त्यांना चामडीच्या पट्ट्याने मारहाण केली. तिघांविरोधात तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

दै.रायगड नगरी । पनवेल

जुन्या भांडणाचा राग मनात धरून आरोपीने ३० वर्षीय महिलेचा विनयभंग केला आहे. आरोपी विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील फिर्यादी आणि आरोपी हे एकमेकांचे नातेवाईक असून यातील २५ वर्षीय आरोपीने जुन्या भांडणाचा राग मनात धरून पीडित महिलेच्या सासऱ्यांना शिवीगाळ केली. आणि लोखंडी हातोडी त्यांच्या कमरेवर मारली. यावेळी पीडित महिलेचे पती आले असता आरोपीने त्यांनादेखील शिवीगाळ करून धक्काबुक्की केली. त्यानंतर पीडित महिला मध्ये आली असता आरोपीने त्यांचे केस पकडले आणि त्यांचा विनयभंग केला. या झटापटीत पीडित महिलेच्या डाव्या डोळ्याला दुखापत झाली आहे. आरोपीने पीडित महिलेच्या घराच्या काचा फोडल्यानंतर आरोपी पळून गेला.

बापाने केला मुलीवर बलात्कार

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेल तालुक्यातील एका गावात राहणाऱ्या ४० वर्षीय बापाने स्वतःच्या मुलीवर बलात्कार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. तालुका पोलिसांनी आरोपी बापाला अटक केली आहे. येथील पीडित मुलगी १७ वर्षांची असून तीच्या वडिलांनी तिच्यावर बलात्कार केला. ती गर्भवती राहिल्यानंतर प्रकार उघडकीस आला. त्यानंतर आरोपी फरार झाला होता. पोलिसांनी त्याला अटक केली. त्याची कोरोना चाचणी केली असता तो पॉझिटिव आला. त्यामुळे आरोपीची रवानगी इंडिया बुल्स, कोन येथे करण्यात आली आहे.

व्यापारी वर्गाने आरटीपीसीआर किंवा अँटीजेन चाचणी करणे बंधनकारक!

दै.रायगड नगरी । रोहा

कोरोनाचे आव्हान अजून कायम असल्याने 'ब्रेक दि चेन' करिता अनलॉकच्या सुधारित आदेशानुसार काहीप्रमाणात शासनाने निर्बंध शिथिल केले असले तरी कोरोना बाबतीत हलगर्जीपणा नको. व्यापारी वर्गाने आरटीपीसीआर किंवा अँटीजेन चाचणी करने बंधनकारक असून सर्वांनी कोरोना नविन नियमावलिचे काठेकोरपणे पालन करावे असे आवाहन आम. अनिकेत तटकरे यांनी रोहा येथिल शासकीय अधिकारी आणि व्यापारी वर्ग यांच्या संयुक्त बैठकीत केले.

या वेळी प्रांताधिकारी डॉ. यशवंतराव माने, उपविभागीय पोलीस अधिकारी किरणकुमार सूर्यवंशी, तहसीलदार कविता जाधव, नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, पो. नि. नामदेव बंडगर, जिल्हा कार्यध्यक्ष मधुकर पाटील, सरचिटणीस विजय मोरे, नगरसेवक राजू जैन, महेंद्र गुजर, मयूर दिवेकर, महेश कोलटकर, सिटीझन फोरमचे निमंत्रक अप्पा देशमुख, व्यापारी मंडळांचे पदाधिकारी उपस्थित होते. रोहा शहारा समवेत सर्वत्र हळूहळू व्यापार उधोग व्यवसाय व बहुतांश दुकाने सुरू होत आहेत, या करिता प्रत्येक व्यापारी बांधवांनी आरटीपीसी आर किंवा अँटीजेन चाचणी करून घ्यावी असे आवाहन आम. अनिकेत तटकरे यांनी केले, लॉक डाऊनच्या सर्व नियमांचे पालन रोहे शहरातील व्यायापरी बांधवाकडून होत आहेत, असे असताना इतर ठिकाणी मात्र नियम पायदळी तुडविले जातात या विषयी प्रशासनाने गांभीर्यापूर्वक लक्ष द्यावे असे देखील आम.तटकरे यांनी सांगितले. येत्या तीन दिवसात सोने चांदी व्यापारी मंडळ अँटीजेन चाचणी करून घेणार असे राकेश जैन यांनी सांगितले तर प्रांत अधिकारी डॉ. माने या पुढे विकेंड अर्थातच शनिवारी रविवारी बाजारपेठ बंद न ठेवता सुरू ठेवण्यात येईल अशी माहिती दिली त्याचप्रमाणे त्यांनी नव्याने आलेल्या नियमावलीतिल नियम सर्वांना समजावून सांगितले.

माथेरानमध्ये जीवनावश्यक वस्तूंच्या वाहतूकीला सीएनजी व ई रिक्षातून परवानगी मिळावी

सुनिल शिंदे यांची सुप्रीम कोर्टात याचिका दाखल

दै.रायगड नगरी । कर्जत

जगप्रसिद्ध थंड हवेचे ठिकाण असलेलय माथेरानमध्ये वाहनांना बंदी आहे. त्यामुळे येथे वाहतुकीसाठी घोडे, हातगाडी आदींचा वापर होतो. अधिक श्रम आणि कष्ट वाहतुकीला होत असल्याने हि बाब खर्चिक होते. तेव्हा त्याचा परिणाम वस्तुंच्या किमतीवरही होतो. त्यामुळे येथील पर्यावरण पूरक वातावरण अबाधित राखत केवळ जीवनावश्यक वस्तूंची वाहतूक सीएनजी व ई रिक्षातुन व्हावी यासाठी येथील नागरिक सुनील शिंदे यांनी सुप्रीम कोर्टात धाव घेतली आहे. त्यामुळे आता देशातील सर्वोच्च न्यायालय याबाबत काय निर्णय घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

माथेरान हे जगातील प्रसिद्ध असे थंड हवेचे पर्यटन स्थळ आहे. ब्रिटिश काळापासून येथे वाहनांना बंदी आहे. तर सुप्रिम कोर्टाच्या आदेशानुसार फेब्रुवारी २००३ मध्ये माथेरानला पर्यावरण दृष्ट्या संवेदनशील क्षेत्र जाहीर करण्यात आले. यात रुग्णवाहिका व अग्निशमन दलाच्या वाहनांव्यतिरिक्त इतर वाहनांना येथे बंदी घालण्यात आली. त्यामुळे येथील वाहतूक घोडे, व मानवी श्रमाने ओढल्या जाणाऱ्या हातगाड्या या वरच होते. या सर्वांचा परिणाम सर्व प्रकारच्या वस्तूंसाठी जास्त पैसे ग्राहकांना मोजावे लागतात. दूध, भाजीपाल्यासाठी रु १० ते ४० रुपये अधिक द्यावे लागतात. तर चिकन साठी १०० रुपये जास्त द्यावे लागतात. घरघुती गॅसची वाहतूक घोड्यांवर होत असल्याने त्यासाठी २०० रुपये जास्त द्यावे लागतात. कोरोना महामारीमुळे सतत लॉक डाऊन होत आहे. पर्यटन व्यवसाय हि ठप्प असल्याने केवळ पर्यटन व्यवसायावर अवलंबून असलेले माथेरानकर आर्थिक संकटात सापडले असताना वाहन बंदी कायद्यामुळे जीवनावश्यक वस्तू अधिकच्या दराने विकत घ्याव्या लागतात. तेव्हा येथील पर्यावरण पूरक वातावरण अबाधित ठेवत प्रदूषण विरहित सीएनजी व इलेक्टरीक वाहनांना येथे परवानगी मिळावी यासाठी सामाजिक कार्यकर्ते सुनिल शिंदे यांनी सुप्रीम कोर्टात रिट पिटीशन दाखल केली असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

गतवर्षी मुंबई हायकोर्टाने जीवनावश्यक वस्तू साठी टेम्पोला ३० सप्टेंबर पर्यंत परवानगी दिली होती. मात्र सनियंत्रण समितीने या टेम्पोला फक्त गॅसच्या टाक्यांसाठी वापरास परवानगी दिली ती फक्त आठवड्यात तीन दिवस त्यामुळे इतर जीवनावश्यक वस्तूंसाठी जास्त पैसे मोजावे लागतात. ग्राहक संरक्षण कायदा १९८६ अन्वये प्रत्येक वस्तू छापील किमतीनुसार ग्राहकांना मिळाली पाहिजे तो त्यांचा अधिकार आहे. इको सेन्सेटीव झोनच्या अधिसूचनेत सीएनजी व बॅटरी वर चालणाऱ्या वाहनांचा कायमस्वरूपी समावेश करावा व याच्या नियोजनासाठी तात्काळ सनियंत्रण समितीची स्थापना करावी कारण दोन वर्षापूर्वी समितीची मुदत संपली आहे. शिंदे यांच्यावतीने दिल्लीतील ज्येष्ठ वकील विवेक शर्मा कोर्टात बाजू मांडणार आहेत.

माथेरानच्या हात रिक्षा चालकांना ई रिक्षा सुरू करता येतील. ई रिक्षा सुरु झाल्यास हातरिक्षा चालकांची अमानवीय प्रथेतून मुक्ती होईल व शालेय विध्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व्यक्ती, महिला यांची वाहतुकीची गैरसोय दूर होईल व येथील पर्यटन व्यवसायात क्रांती होईल असा विश्वास सुनिल शिंदे यांनी व्यक्त केला.

वडखळ सरपंच राजेश मोकल यांची भाजपला सोडचिट्ठी

दै.रायगड नगरी । पेण

पेण तालुक्यातील महत्वाची असणाऱ्या व नुकताच १३ सदस्यांनी दाखल केलेल्या अविश्वास ठरावा विरोधात जनतेतून विश्वासाने निवडून आलेले भाजपचे सरपंच राजेश भिकाजी मोकल यांनी भाजपाचा राजिनामा दिला आहे. राजेश मोकल यांच्या राजीनाम्यामुळे भाजपला मोठे खिंडार पडणार असल्याची चर्चा आहे.

राजेश मोकल यांना मानणारा मोठा वर्ग वडखळ, बोरी, शिर्की, वाशी विभागात आहे. राजेश मोकल यांच्या पत्नी पूजा मोकल याअधी पंचायत समितीच्या वडखळ गणातून निवडून आल्या होत्या. नंतरच्या निवडणुकीत राजेश मोकल ही पंचायत समितीच्या वडखळ गणातून निवडून आले होते. त्यानंतर झालेल्या जनतेतून थेट सरपंच निवडणूकीत ते निवडून येऊन सरपंच पदाची धुरा सांभाळली होती.

सरपंच झाल्यानंतर त्यांनी पंचायत समिती सदस्य पदाचा राजीनामा दिला होता. नुकताच त्यांच्यावर १३ सदस्यांनी अविश्वास ठराव दाखल केला होता. तो मंजूर झाल्यानंतर ग्रामसभा होऊन जनतेने पुन्हा राजेश मोकल यांच्या बाजूने मतदान करून त्यांना पुन्हा सरपंच पदावर विराजमान होण्याची संधी दिली. दरम्यानच्या घडामोडीत भाजप नेतृत्वाने अनेक गोष्टींकडे दुर्लक्ष केल्याने राजीनामा देत असल्याचे राजेश मोकल यांनी सांगितले.

पंचायत स. तळा येथे व तालुक्यातील ग्रामपंचायतीत शिवराज्याभिषेक दिन स्वराज्य गुढी उभारून साजरा

दै.रायगड नगरी । तळा

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांनी ६ जून १६७४ साली छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वतःचा राज्याभिषेक करून घेतला तो दिवस स्वराज्याची, सार्वभौमत्वाची स्वातंत्र्याची प्रेरणा देणारा दिवस आहे.

काशीचे विदवान पंडीत वेदमूर्ती गागाभट्ट यांच्या आज्ञेनुसार रायगडावर शिव राज्याभिषेक करण्यात आला होता. इतिहासाला उजाळा देण्यासाठी आज संपूर्ण महाराष्ट्र भर ६ जुन रोजी साजरा करण्याचे शासनाने आदेश देण्यात आले असल्याने पं स.तळा येथे सकाळी शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला गटविकास अधिकारी विजय यादव यांच्या हस्ते पुष्पहार अर्पणकरूनशिवस्व राज्यगुढीउभारण्यातआली.त्यावेळी गटविकास अधिकारी विजय यादव, गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट ग्रामविकास अधिकारी पुष्पा नेरकर, लेखनीक स्वाती पाटील, शिक्षक वर्ग क्रेंद्रप्रमुख कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

पोलादपूर पेट्रोल पंपावर घुमल्या काँग्रेसींच्या घोषणा 'मोदीसरकार धिक्कार है'

महागाई व इंधनदरवाढीचा जाहिर निषेध

दै.रायगड नगरी । पोलादपूर

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नानाभाऊ पाटोळे आणि प्रदेशउपाध्यक्ष माणिकराव जगताप यांच्या आदेशानुसार पोलादपूर तालुका भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने पेट्रोलपंपावर सोमवारी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास महागाई व इंधनदरवाढीचा जाहिर निषेध करण्यासाठी जाहिर घोषणाबाजी आंदोलन केले. पोलादपूर तालुका काँग्रेसचे काळजीवाहू अध्यक्ष अजय सलागरे यांनी या आंदोलनाचे नेतृत्व केले.

याप्रसंगी माजी अध्यक्ष अनंत पार्टे, पोलादपूर पंचायत समितीचे माजी सभापती दिलीप भागवत, विद्यमान उपसभापती शैलेश सलागरे आदींसह शहर अध्यक्ष अमोल भुवड, तालुका महिला अध्यक्षा सुवर्णा भुवड, पोलादपूरच्या नगरसेविका शुभांगी चव्हाण, शुभांगी भुवड, रेखा सोनावणे, तालुका काँग्रेसचे पदाधिकारी रामदास सकपाळ, प्रदीप नरे, स्वप्नील भुवड, दिनेश पाटील, नसीर धामणकर, सिराज फकीर तसेच ॲड.सचिन गायकवाड आदी कार्यकर्ते तसेच पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी पोलादपूर तालुका काँग्रेसचे काळजीवाहू अध्यक्ष अजय सलागरे यांनी देशातील कोरोनासारख्या महामारीकाळात केंद्रसरकार महागाईवर नियंत्रण ठेवण्यात पूर्णपणे अपयशी ठरले असल्याची टीका करून सर्वसामान्यजनतेच्या जीवनात या केंद्रसरकारने मोठ्या प्रमाणात गोंधळ घातला असल्याने माजी आमदार व प्रदेशउपाध्यक्ष माणिकराव जगताप यांच्या आदेशानुसार हे निषेध आंदोलन हाती घेतल्याचे सांगितले.

काही मिनीटे सुरू असलेल्या या आंदोलनामध्ये दोन वक्त्यांच्या खासगी वाहिनीसाठी बाईटसदृश्य भाषणांचा समावेश होता. शेवटी 'मोदीसरकार धिक्कार है' अशा घोषणांनी या आंदोलनाची सांगता झाली.

ऑनलाईन चर्चासत्र संपन्न

दै.रायगड नगरी । पनवेल

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त निसर्गमित्र संस्थेने आयोजित केलेल्या पर्यावरणपूरक विकास आराखडा विषयावर ऑनलाईन चर्चासत्रात पनवेल पालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी भाग घेतला. या ऑनलाईन चर्चासत्रात पमपा आयुक्त मा.सुधाकर देशमुख, वास्तुविशारद मा.सतीश कोळवणकर, सँच्युअरी नेचर फाऊंडेशनचे संचालक डॉ.परवीश पंड्या, ठाणे परिमंडळाचे मुख्य संरक्षक रामा राव, पोलीस उपायुक्त शिवराज पाटील यांच्यासह पनवेलमधील राजकीय क्षेत्रातील सर्व मान्यवर आणि निसर्गमित्र संसंस्थेचे प्रतिनिधी सहभागी होते.

चर्चासत्र दरम्यान वृक्ष लागवड व संवर्धनासाठी सिडको, महानगरपालिका व एअरपोर्ट अथॉरिटी यांची संयुक्त समिती तयार करून पुढील पन्नास वर्षाचा विकास आराखडा तयार करण्याचे सुचविले तसेच जेवढे रिझर्वेशन गार्डन किंवा मैदानी खेळाचे प्लॉट आहेत याची माहिती नागरिकांना खुली करावी. डेव्हलपमेंटचा विचार करून पालिकेने रस्त्यावरील किंवा रिझर्व्ह प्लॉटवरील वृक्षारोपणाचा कृती आराखडा बनवावा, जेणेकरून रस्ते वाइंडिंग किंवा इतर कारणांमुळे वृक्षतोड होणार नाही.

शिवसेना आक्रमक : अभियंत्याच्या तोंडाला फासले काळे

दै.रायगड नगरी । म्हसळा

म्हसळा तालुक्यात रस्त्यांचे निकृष्ट दर्जाचा होत असलेली कामे पाहून शिवसेना आक्रमक झाली आहे.शिवसेना तालुका प्रमुख नंदू शिर्के यांनी थेट बांधकाम अभियंता डोंगरे यांच्या तोंडाला काळे फासल्याची घटना गटविकास अधिकारी यांच्या कक्षात घडली.

रस्ते विकास व मजबुतीकरण कामा अंतर्गत म्हसळा तालुक्यातील भापट या रस्त्याला सुमारे १० लक्ष रुपयांचा निधी मंजूर झाला होता.हा निधी खर्च करून या रस्त्याचे काम ३ जून रोजी पूर्ण झाले असून हा रास्ता ४ जून रोजी वाहून गेल्याचे वृत्त समाज माध्यमावर वाऱ्यासारखे फिरत होते.समाज माध्यमात आलेल्या वृत्ताची शहानिशा करण्यासाठी शिवसेनेचे माजी तालुका प्रमुख नंदू शिर्के यांनी स्वतः भापट येथे जाऊन रस्त्याची पाहणी केली.लाखो रुपये खर्च करून भापट येथील नव्याने झालेला रस्ता हा निकृष्ट दर्जाचा व एक महिना देखील टिकू शकत नाही असे शिर्के यांच्या निदर्शनास आले.

भापट येथील रस्ता पाहून झाल्यानंतर शिर्के निकृष्ट दर्जाचे रस्त्याच्या कामाची चौकशी करण्यासाठी पंचायत समिती येथे गेले.पंचायत समिती येथे गटविकास अधिकारी यांच्या कक्षात जिल्हा परिषदेचे म्हसळा बांधकाम विभागातील अभियंता संजय डोंगरे हे देखील उपस्थित होते.यावेळी रस्त्याबाबत अभियंता डोंगरे यांनी चुकीची माहिती देत असल्याचा रागातून शिवसेना माजी तालुका प्रमुख नंदू शिर्के यांनी जनतेचा पैसा आहे हा, पैसाचा योग्य वापर करायला शिकून कामे चांगल्या दर्जाची करा असे सांगून अभियंता संजय डोंगरे यांचा तोंडाला काळे फासले.यावेळी त्यांचा सोबत शिवसेनेचे जेष्ठ नेते बाळ करडे,सुरेश कुडेकर,शिवसेना शहर प्रमुख अनिकेत पानसरे,दिपल शिर्के, वाहतूक सेनेचे शाम कांबळे,युवासेना तालुका अधिकारी अमित म्हामूनकर,अक्रम साने,राहुल जैन यांच्या सहित शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

अखेर 'यशवंती खार' चे संकट टळले ; शेतीसाठी सातत्याने ग्रामस्थांचा पुढाकार

यशवंती खार वाचविण्यासाठी प्रशासन लक्ष देईल का? ; ग्रामस्थांचा सवाल

दै.रायगड नगरी । दिघी

गतवर्षी श्रीवर्धन तालुक्यात कोरोना संकटासोबत निसर्ग वादळाने सर्व काही उध्वस्त केले. असे असताना देखील त्याचवेळी शिस्ते – दिवेआगर मार्गावरील यशवंती खारभूमीलगत असणाऱ्या खाडीचे दरवाजे तुटल्याने समुद्राच्या भरतीचे पाणी शेतात घुसून मोठे नुकसान झाले होते. यावेळी पुन्हा एकदा तीच परिस्थिती ओढवली गेली. मात्र, ग्रामस्थांनी पुढाकार घेऊन वेळीच खाडीचे दरवाजे बसवून यंदाच्या शेतीचे होणारे नुकसान थांबवले आहे.

परंतु, सबंधित प्रशासनाला याची काही पडली नाही. खाडीचे दरवाजेची देखभाल करण्याची जबाबदारी अखेर कुणाची असा संतप्त सवाल शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे. दिवेआगर खाडी लगत बोर्लीपंचतन परिसरातील चार ते पाच गावांतील अनेक शेतकऱ्यांची अंदाजे २०० हेक्टर क्षेत्रात खारशेती जमीन आहे. त्यात शेतकरी दरवर्षी भातशेतीचे उत्पन्न घेतात. समुद्राच्या खाडीतून शेतात समुद्राचे पाणी जाऊ नये यासाठी भक्कम दरवाजे असलेली 'सात उघडी' आहे. मात्र, दरवर्षी बेजबाबदारपणे होत असलेल्या मासेमारीमुळे हे दरवाजे उध्वस्त होतात. त्यामुळे शेतकऱ्यांची शेकडो हेक्टर शेतजमीन पाण्याखाली जाते. गेल्यावर्षी शेती हंगामात सुरुवातीला सात उघडीचे झडपा तुटल्याने शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून झडपा बसवण्यात यावे अशी मागणी शेतकऱ्यांकडून सातत्याने होत होती. मात्र, याबाबत कोणतेही सोयरसुतक नसलेल्या खारभूमी सर्व्हेक्षण व अन्वेक्षण विभागाकडून शेतकऱ्यांच्या मागणीकडे त्यावेळी ही दुर्लक्ष केल्याने पिकाचे मोठे नुकसान झाले.

तालुक्यातील ग्रामीण भागात यावर्षीही कोरोना संकटामुळे अनेक कुटुंब रोजगारापासून वंचित आहेत. हे सहन करत असताना कुठे चार घास खायला मिळतील, या उद्देशाने जगणाऱ्या यशवंती खार शेतकऱ्यांवर पुन्हा 'सात उघडी' चे दरवाजे तुटल्याने या वर्षीचे पिक सुध्दा वाया जाईल अशी भीती कायम होती. मात्र, यावेळी ही स्थानिक ग्रामस्थांकडून वेळेत दरवाजे दुरुस्ती झाल्याने हजारो शेतकऱ्यांची जमीन नापीक होताना वाचली आहे.

खाडीचे अचानक होणारे नुकसान, यावर दुरुस्तीसाठी राखीव निधी उपलब्ध नसतो. तसे सुरुवातीला मागणी नुसार प्रस्तावित टेंडर निघून कामे केली जातात. मात्र, अचानक होणाऱ्या नुकसानीने देखभाल, दुरुस्तीला स्वतंत्र निधी उपलब्ध होत नाही. यशवंती खारभूमीलगत असणाऱ्या खाडीचे दरवाजांचे नुकसान येथे बेजबाबदारपणे होणाऱ्या मासेमारीमुळे होत आहे. यावर खारभूमी सर्व्हेक्षण व अन्वेक्षण विभागाने उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.